# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.

**विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या दिनांक २५.०३.२०१३ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचा इतिवृत्तांत .**

दिनांक २५.०३.२०१३ रोजी दुपारी ०२.०० वाजता मा. कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मधुकर गायकवाड | : | मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई तथा अध्यक्ष |
| २. | श्री. आर. बी. गाडगे, उप सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) मंत्रालय, मुंबई. | : | शासन प्रतिनिधी |
| ३. | श्रीमती सरोज देशपांडे, कल्याण आयुक्त (प्रशासकीय), मुंबई | | शासन प्रतिनिधी |
| ४. | श्री. अनिल ढवळे | : | मालक प्रतिनिधी |
| ५. | श्री. रमेश सारडा | : | मालक प्रतिनिधी |
| ६. | श्री. प्रकाश देवतळे | : | मालक प्रतिनिधी |
| ७ | श्री. मुनवर शेख | : | कामगार प्रतिनिधी |
| ८. | श्री. राजेश कुले | : | कामगार प्रतिनिधी |
| ९ | श्री. दादाराव डोंगरे | : | कामगार प्रतिनिधी |
| १०. | श्रीमती राधिका गायकवाड | : | कामगार प्रतिनिधी |

सर्वप्रथम मा.अध्यक्षांनी उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात केली.

**विषय क्र. १ : मागील बैठकीच्या इतिवृत्तास मंजुरी देणे.**

सुरुवातीस मागील दि. २३.१.२०१३ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तांतास मंजूरी देण्यात आली. श्री. डोंगरे यांनी सूचना केली की, प्रोसिडींग बुक ठेवण्यात यावे. त्याचप्रमाणे मंडळाच्या बैठकीचे इतिवृत्तांत ई-मेलवरुन सर्व सदस्यांना देण्यात यावे. यामुळे इतिवृत्तांत सर्व सदस्यांना ताबडतोब मिळेल. श्री. डोंगरे यांनी त्यांना अद्याप ऑडीटची प्रत मिळाली नसल्याचे सांगितले, जे की मा.अध्यक्षांनी ही प्रत लगेचच देण्यात येईल असे सांगितले. श्री.डोंगरे यांनी सुचविले की, या क्षेत्रात कार्यरत असलेल्या कामगार संघटनेस या कामगारांची नोंदणी केल्यास प्रत्येक अर्जामागे रु. ७५/- एवढी रक्कम देण्यात यावी. मा.अध्यक्षांनी सदरील बाब मागे चर्चेस आली होती. ही बाब धोरणात्मक बाब असल्याने नियम करुनच अंमलबजावणी होवू शकते याकडे सदस्यांचे लक्ष वेधले.

मंडळास माहिती देण्यात आली की, उपकर रु. १०९८.७४ जमा झालेला आहे. या उपकरातून प्रशासकीय बाबीपोटी रु.१२.४३.५४७/-खर्च तसेच मे.पृथ्वी असोसिएटस् व एम.एस.एस.आय.डी.सी. यांना रु. ९,६९,१५,९५४/- खर्च जाहिरातीपोटी द्यावयाचा आहे व योजनांवर रु. ३५,०८,८००/- खर्च झालेला आहे. याबाबत मंडळाने सर्व खर्चास तसेच लाभार्थ्यांच्या सर्व अर्जास सर्वानुमते मंजुरी प्रदान केली व सदस्यांनी मंडळाच्या जाहिरातीत सदस्यांची किमान नावे तरी टाकण्यात यावीत असे मत व्यक्त केले. श्री. डोंगरे यांनी टास्कफोर्सची निर्मिती करण्यावर भर दिला. या टास्कफोर्समध्ये कामगार उप आयुक्त, सहायक कामगार आयुक्त असे जिल्हास्तरावरचे अधिकारी तसेच न्यायिक सदस्य व पोलीस अधिकारी व मंडळाचा एक सदस्य यांचा अंतर्भाव करावा असेही सुचविले. यावर मा.अध्यक्षांनी सदरील बाब तपासून नियम करता येतील का हे पहावे लागेल असे सांगितले.

श्री. फुले यांनी म.न.रे.गा. कामगारांच्या नोंदणीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बनविण्यात आलेल्या समितीमध्ये मंडळाच्या सदस्यांचा समावेश करावा असे सांगितले. त्याचप्रमाणे नागपूर येथे अपर कामगार आयुक्त कार्यालयाची जागा बदलली जात असल्याने ही जागा मंडळासाठी भाडयाने घ्यावी असे सुचविले. श्री. फुले यांनी औरंगाबाद व पुणे येथे मंडळाच्या कामासाठी दौरा केला असून या दौ-यास मंजुरी द्यावी असेही सांगितले. यानुसार या दौ-यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. श्री. फुले यांनी मंडळाने कंत्राटी पध्दतीने नोकरभरती करावी असे

सुचविले. त्यानंतर मंडळाने तयार केलेल्या सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर चर्चा करण्यात आली. त्यावेळी श्री. फुले व श्री. डोंगरे यांनी सुचविले की, ज्या ज्या योजना मंडळाने पारित केलेल्या आहेत, त्या सर्व योजनांचा समावेश अर्थसंकल्पात करण्यात यावा व या योजनांची अंमलबजावणीही करण्यात यावी. श्री.ढवळे, श्री.देवतळे, श्री.शेख व अन्य सदस्यांनी अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात अंदाजित जो खर्च दाखविलेला आहे तो पुरेसा नाही व त्यात वाढ करण्यात यावी असे सुचविले. यवर अध्यक्षांनी नवीन योजनावंर टोकन तरतूद करुन वर्षभरात आवश्यकतेनुसार खर्च वाढविण्याची तरतूद करता येते हे सांगितले. त्यावर श्री.गाडगे, उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी असे प्रतिपादन केले की, गेल्या वर्षाचा प्रत्यक्षात झालेला खर्च पहाता, पुढील वर्षाचा खर्च ठरवावा लागतो. यामुळे अशा अंदाजपत्रकात मागील वर्षाच्या खर्चापेक्षा एकदम फार मोठया रकमेची वाढ करणे अभिप्रेत नाही. यावर मा.अध्यक्षांनी सुध्दा सहमती दर्शविली.

सर्व सदस्यांचे म्हणणे असे की, मंडळात कामगारांची नोंदणी दिवसेंदिवस वाढत चालली आहे व लाभार्थी कामगारांचे अर्ज सुध्दा वाढत चालले आहेत. हे पाहता आताच भरीव तरतूद करणे उचित राहील.

श्री. ढवळे यांनी राज्यात विभागवार ॲकॅडमी करण्यात यावी व त्यासाठी रु. १५०/- कोटीची तरतूद करावी असे सुचविले. त्यास इतर सदस्य श्री.फुले, श्री.डोंगरे, श्री.सारडा, श्री.देवतळे व श्रीमती राधिका गायकवाड यांनी श्री. ढवळे यांच्या म्हणण्यास दुजोरा दिला. त्यावर श्री.गाडगे यांनी ॲकॅडमी येत्या आर्थिक वर्षात चालू करण्यासाठी आवश्यक ती पूर्वतयारी चालू आहे का ते पहावे, कारण यासाठी प्रथमतः जमीन असणे व तसा ठोस प्रस्ताव असणे आवश्यक असते असे सांगितले. यावर श्री. श्री.ढवळे व इतर सदस्यांनी असे प्रतिपादन केले की, आर्थिक तरतूद करण्यात यावी म्हणजे बाकीच्या गोष्टी आपोआपच करता येवू शकतील. अशाप्रकारे सर्वानुमते ॲकॅडमीसाठी रु. १५०/- कोटीचा ठराव करण्यात आला.

कामगारांच्या मुलांसाठी होस्टेल बनविण्याची बाब आवश्यक असल्याचे श्री.ढवळे यांनी प्रतिपादले. यासाठी ६ विभागाकरिता प्रत्येकी रु. १० कोटी याप्रमाणे रु. ६० कोटी एवढी तरतूद

करण्यात यावी असेही त्यांनी सुचविले. त्यास अन्य सदस्यांनी सहमती दर्शविली. अशा रितीने होस्टेलसाठी रु. ६० कोटीची तरतूद करण्याबाबतचा प्रस्ताव सदस्यांनी मान्य केला.

मंडळाची जाहिरात करण्यासाठीची तरतूद वाढवून ती रु. ५० कोटी करावी. त्याचप्रमाणे हेल्थ इन्शुरन्ससाठी रु. ५० कोटी, शैक्षणिक अर्थसहाय्यासाठी रु. १० करोड तसेच एस.टी महामंडळाच्या बसेसने कामगारांना मोफत प्रवास करण्यासाठी रु. १० करोड त्याचप्रमाणे बायोमॅट्रीक्स पध्दतीसाठी रु. २ कोटीची तरतूद अर्थसंकल्पात करावी असे सर्व सदस्यांनी सांगितले. पुढील वर्षात इतर योजनांवर रु. ५० कोटी एवढी तरतूद करण्यात यावी असे सांगितले. यावर श्री. गाडगे, उप सचिव यांनी या रकमा अधिक होतात असे सांगितले. मा.अध्यक्षांनी श्री.गाडगे यांच्या मतास दुजोरा दिला व सदस्यांनी सांगितलेली आकडेवारी मा.अध्यक्षांना मान्य नसल्याचे स्पष्ट केले. परंतु हा ठराव मंजूर झाला असल्याचे सांगितले.

सर्वश्री डोंगरे, फुले, ढवळे, देवतळे व श्री. सारडा यांनी यापूर्वीच बैठकीत चर्चा केल्याप्रमाणे कामगारांना वस्तू वाटपाबाबत कार्यवाही करावी असे सांगितले उदा. वस्तुवाटपात मच्छरदाण्या, सायकल, ब्लॅकेटस्, शिलाई मशिन्स् इ. वस्तूंचा समावेश असावा असेही त्यांनी सुचविले. यावर मा.अध्यक्षांनी याबाबतीत कायद्यात स्पष्ट उल्लेख नसल्यामुळे नियमात तरतूद असणे आवश्यक राहील असे सांगितले.

मा.अध्यक्षांनी सांगितले की, वेगवेगळया जिल्हयातून लाभार्थींचे अर्ज आलेले आहेत व जे येणे चालूच आहेत, त्यामुळे लाभार्थींना लाभ लवकर देण्यासाठी याबाबत मा.अध्यक्षांना अधिकार असणे आवश्यक आहे. यावर मंडळ सदस्यांनी अर्ज मंजुरीसाठी जिल्हावार समिती तयार करुन त्यात मंडळ सदस्यांचा समावेश असावा असे मत व्यक्त केले. मा.अध्यक्षांनी याबाबतीत बिगर शासकीय सदस्याचा समावेश होवू शकतो का हे पडताळून तपासण्याच्या सचिवांना सूचना दिल्या. श्री. देवतळे व श्री.डोंगरे यांनी अंत्यविधीसाठी अर्थसहाय्य तात्काळ मिळणे आवश्यक असल्याने त्याचे अधिकार स्थानिक अधिका-यांना देण्यात यावेत असे सांगितले. त्यास श्री.फुले यांनीही सहमती दर्शविली, जेणेकरुन असे सहाय्य तात्काळ मिळू शकेल. मा.अध्यक्षांनी सध्या आलेल्या व येणा-या अर्जाबाबतच्या कारवाईबाबत विचारणा केल्यावरुन सध्या पुरते मा.अध्यक्षांनी लाभार्थींचे अर्ज मंजूर करावेत, परंतु याची माहिती पुढील बैठकीत देण्यात यावी असे सदस्यांनी सांगितले.

श्री.देवतळे यांनी चंद्रपूर जिल्हयामधून काटेकोरपणे उपकर जमा होतो किंवा कसे हे तपासण्याविषयी सांगितले. म.न.रे.गा. योजनेअंतर्गत नोंदणीमध्ये फारशी वाढ होईल किंवा कसे याबाबत त्यांनी शंका वर्तविली व उपकर जमा करणे व नोंदणी करणे यावर पुढील आर्थिक वर्षात भर देण्याचे सुचविले.

वर सुचविल्याप्रमाणे अर्थसंकल्पात दुरुस्ती करण्यात यावी असे सर्व सदस्यांनी सांगितले व अंतिमरित्या सोबत जोडलेल्याप्रमाणे सन २०१३-२०१४ चा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला. उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

**कामगार आयुक्त तथा अध्यक्ष,**
**महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम**
**कामगार कल्याण मंडळ,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**